**प्रेसनोट** **दिनांक: ०३/०९/२०२६**

**''एमआयडीसी पोलीस ठाणे हददीत माथाडी युनियनच्या नावाखाली स्वत:च्या टोळीचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी एमआयडीसी, अंधेरी व मुंबई उपनगर परिसरामधील कंपन्या व बांधकाम व्यावसायिक यांच्यावर दहशत निर्माण करणाऱ्या टोळीविरूद्ध 'महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा, १९९९' (MCOCA) अन्वये कारवाई केल्याबाबत''**

एमआयडीसी पोलीस ठाणे हददीत माथाडी कामगार युनियनच्या नावाखाली टोळीचे वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने खंडणी घेण्यासाठी इसम नामे नदिम नसरुदीन शेख, वय २७ वर्ष यांना गुन्हयातील ०७ अटक आरोपी व ०४ पाहिजे आरोपी यांनी सुनियोजीत रित्या फौजदारी पात्र कट रचुन त्यांचा जीव घेण्याच्या उद्देशाने लाकडी दांडयांनी डोक्याला व पायाला मारहाण केली. म्हणुन आरोपीं विरूद्ध दिनांक १७/०८/२०२६ रोजी गु.र.क्र ९२५/२०२६ कलम १०९(१), १८९(१), १८९(२),१९०, १९१(२), ११८(२), ३५२, ३०८(४), ६१(१)(अ) भा. न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**नमुद गुन्हयामध्ये खालीलप्रमाणे एकुण ०७ आरोपी यांना अटक करण्यात आली आहे.**

१) पुरण अरूण सिंग, उर्फ चड्डा, वय ३९ वर्षे, २) रोहित मधुकर साळुंखे, वय २७ वर्षे, ३) इम्रान बसुद्दिन हवालदार, वय ३७ वर्षे, ४) सुरेश गुलाबचंद गौड उर्फ किसन, वय ३० वर्षे, ५) आकाश मानसिंग सिंग उर्फ नेपाळी, वय ३० वर्षे ६) राजकुमार सेल्वन मुन्नुस्वामी उर्फ लाला ७) अर्जुन मुनियान मुत्तू उर्फ डाकु, वय - ३७ वर्षे.

वरील अटक तसेच पाहिजे आरोपी यांनी माथाडी कामगार टोळीच्या नावाने बेकायदेशीर कृत्य करण्याकरीता एक संघटीत टोळीची स्थापन केली आहे. पाहिजे आरोपी **कन्नन चिन्नादुराई वन्नियार उर्फ बडा कन्ना** हा या टोळीचा प्रमुख असुन स्वत:च्या तसेच टोळीच्या आर्थिक फायदयासाठी व टोळीचे वर्चस्व अबाधित ठेवण्यासाठी नमुद गुन्हा केल्याचे तपासादरम्यान निष्पन्न झाले आहे. अटक व पाहिजे आरोपी यांच्याविरूद्ध यापुर्वी खुनाचा प्रयत्न, खंडणी मागणे, जबर दुखापत करणे इ. स्वरूपाचे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

संघटीत गुन्हेगारी टोळीचा प्रमुख कन्नन चिन्नादुराई वन्नियार उर्फ बडा कन्ना हा त्याच्या सदस्यांसमवेत संगनमत करून हिंसा, जबरदस्ती, दहशत तसेच धमकीचा वापर करून उदयोग, बांधकाम व्यावसायिक व व्यापाऱ्यांना माथाडी कामगार युनियनच्या नावाखाली काम न करता 'वाराई' किंवा 'प्रोटेक्शन मनी' म्हणुन जबरदस्तीने कंपन्यांची गाडी आडविणे, तलवारी, चाकु व इतर हत्याऱ्याने जबर मारहाण करून जबरदस्तीने खंडणी गोळा करणे या सारखे बेकायदेशीर कृत्य करीत असल्याचे दिसुन आले आहे. या त्यांच्या कृत्यांमुळे समाजामध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

त्यामुळे उपरोक्त संघटीत टोळीविरूद्ध 'महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा, १९९९' (MCOCA) कलम २३(१) अन्वये मा. सक्षम अधिकारी यांच्याकडुन पुर्वमंजुरी प्राप्त झाल्याने नमुद गुन्हयामध्ये टोळीविरूद्ध (MCOCA) कलम ३(१)(ii), ३(२), ३(४) अन्वये वाढ करण्यात आली आहे.

अशा प्रकारे एमआयडीसी पोलीस ठाणे यांनी व्यावसायिकांवर दहशत निर्माण करणाऱ्या टोळीविरूद्ध (MCOCA) अन्वये यशस्वीरित्या कारवाई केली आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (का व सु) डॉ. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग डॉ. अभिनव देशमुख, मा. पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ ०३, मुंबई श्री दत्ता नलावडे, मा. सहा. पोलीस आयुक्त, अंधेरी विभाग, श्री. योगेश शिंदे, आणि व.पो.नि. श्री घनश्याम नायर यांचे मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी पो.नि. मनोजकुमार माने, सपोनि राक्षे, पोउपनि हुजरे, नवले, धुरी, पर्बत व गोंदुकप्पे यांनी केली आहे.